**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.दिगंबर डी.भोसले
सर्व्हे नं.३०/अ/२/१ व स.नं.३१/१/२,
दौलतनगर सहकारी गृहरचना संस्था, धनकवडी, पुणे ४११ ०४३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगरपालिका, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४७/२००७/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.०८.२००८ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.दिगंबर डी.भोसले
सर्व्हे नं.३०/अ/२/१ व स.नं.३१/१/२,
दौलतनगर सहकारी गृहरचना संस्था, धनकवडी, पुणे ४११ ०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र.४, पुणे महानगरपालिका, पुणे-५

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ------- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.११.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>दौलतनगर को.ऑप.हौ.सोसायटी स.नं.३०, हिस्सा नं.२/१ ब, स.नं.३२ हिस्सा नं.२/१ धनकवडी येथील रस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडील मंजूर ले-आऊट प्लानप्रमाणे आहेत का? जर ले-आऊट प्लानमध्ये दुरुस्ती असेल तर दुरुस्त प्लान महानगरपालिकेकडे आहे का? या रस्त्यावर सोसायटीच्या सभासदांनी अतिक्रमण केले आहे का? असल्यास त्यांना नोटिसा दिल्या आहेत का? |
|---|---|

## सुधारित आदेश

**वाचा :** आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि.११.०५.२००९

श्री. दिगंबर डी.भोसले यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दि.११.०५.२००९ आदेशामधील अ.क्र.२(१) येथे जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री.मकरंद कुलकर्णी यांना रु.६८००/- व सदर आदेशातील अ.क्र.३ येथे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका श्री.मदन आढारी यांना रु.२४,०००/- इतकी शास्ती लावण्यात आलेली आहे.

तथापि श्री.भोसले यांच्या माहितीच्या अर्जाच्या कालावधीत आपण जन माहिती अधिकारी नव्हतो, असे श्री.मकरंद कुलकर्णी यांनी त्यांचे दि.०९.०६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत करुन शास्ती रद्द करण्याची विनंती केली आहे. तसेच या प्रकरणाच्या संपूर्ण कालावधीमध्ये कधीही जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता म्हणून आपण कार्यरत नव्हतो, असे श्री.मदन आढारी यांनी त्यांचे दि.०३.०६.२००९ चे पत्रान्वये आयोगास अवगत करुन शास्ती रद्द करण्याची विनंती केली आहे.

यास्तव, आयोगाने दि.३.०७.२००९ च्या पत्रान्वये नगर अभियंता कार्यालयाकडून प्रस्तुत प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून कोण दोषी आहे त्यांच्या नावासह कालावधी निहाय खुलासा मागविला. त्यानुसार नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी त्यांच्या दि.२४.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांचा तपशील पुढीलप्रमाणे सादर केला आहे :

| **कालावधी** | **जन माहिती अधिकारी** |
| --- | --- |
| १) दि.४.०६.२००७ ते १९.०७.२००७ | श्री.शांताराम ख. थोरात (विकास अभियंता) |
| २) दि.२०.०७.२००७ ते पुढे | श्री.प्रविण वा. गेडाम (नगर उपअभियंता) |

तसेच, सदर प्रकरणामध्ये शास्ती करण्यात आलेले श्री.कुलकर्णी प्रत्यक्षात दि.१०.०७.२००८ पासून जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत आहेत व श्री.मदन आढारी हे दि.१.१०.२००७ पासून अपिलीय प्राधिकारी म्हणून काम पाहत आहेत, असेही नमूद केले आहे.

नगर अभियंता कार्यालयाचे उपरोक्त स्पष्टीकरण विचारात घेऊन श्री. कुलकर्णी व श्री.आढारी यांची शास्ती रद्द करण्याची विनंती मान्य करण्यात येत असून त्यानुसार आयोगाचा सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

आयोगाच्या दि.११.०५.२००५ रोजीच्या आदेशात अंशत: बदल करण्यात येत असून तो खालीलप्रमाणे:

१) सदर आदेशातील अ.क्र.२(१) मध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री.मकरंद कुलकर्णी यांना लावण्यात आलेली शास्ती रु.६८००/- व अ.क्र.३ मध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून श्री.मदन आढारी यांना लावण्यात आलेली शास्ती रु.२४,०००/- रद्द करण्यात येत आहे.

२) (अ) नगर अभियंता कार्यालयाने सादर केलेल्या तपशीलानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका श्री.शांताराम ख.थोरात यांना मूळ अर्जाच्या तारखेपासून तीस दिवस वजा जाता दि.१९.०७.२००७ पर्यंत १५ दिवसांच्या विलंबाबद्दल (२५०x१५) रु.३७५०/- आणि

(ब) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता श्री.प्रविण वा.गेडाम यांना मूळ अर्जापासून तीस दिवस वजा जाता व त्यांचे नियुक्ती दिनांकापासून (दि.२०.०७.२००७) ते दि.१०.१०.२००७ पर्यंत ८२ दिवसांचे विलंबाबद्दल (२५०x८२) रु.२०,५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

३) मूळ अर्ज सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार पाच दिवसांत पाठविला नाही, ३३ दिवसांनी तो अर्ज सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग यांच्याकडे दि. १७.७.२००७ रोजी पोहोचला. त्यांनी दि. १.८.२००७ रोजी माहिती दिली. झालेल्या विलंबाला नगर अभियंता कार्यालयातील कर्मचारी जबाबदार आहेत व ते शास्तीस पात्र ठरतात. अशा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांना विहिती मुदतीचे ३० दिवस वजा जाता २८ दिवसांच्या विलंबाबद्दल (२५०X२८) = रु. ९,०००/- ऐवजी रु. ७,०००/- शास्ती लावावी.

४) शास्तीची रक्कम संबंधितांच्या डिसेंबर २००९ च्या जानेवारी २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा,६०, इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी करावी. तसेच याबाबतची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगास दि. १५.१.२०१० सादर करावा.

५) संबंधित जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांची नावे, त्यांचा कार्यकाल आदि नेमका तपशील संबंधित अधिकाऱ्यांनी दिला पाहिजे. या प्रकरणी उपस्थित अधिकाऱ्यांनी ही जबाबदारी पार पाडली नाही, याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. तसेच यापुढे याबाबत दक्षता न घेतल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल,याची जाणीव आयुक्त, पुणे महानगरपालिका, यांच्यामार्फत महानगरपालिकेच्या सर्व विभागांना देण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ७ / १२/२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.सिंधू किसनराव बारभाई
मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मावळ उपविभाग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी,
तहसील कार्यालय मुळशी, पौड, ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
मावळ उपविभाग, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.संजयसिंह चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी,
तहसील कार्यालय मुळशी, पौड, ता.मुळशी, जि.पुणे प्रतिनिधी श्री.विकास शरद भालेराव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्त्या सौ.सिंधू किसनराव बारभाई यांच्या मागणीनुसार स्पष्टीकरणात्मक माहिती आठ दिवसात देण्याबाबत अपीलकर्त्याशी चर्चा झाली असून त्यांनी ते मान्य केले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मुळशी(पौड), ता.मुळशी, जि.पुणे यांचे प्रतिनिधी श्री.विकास शरद भालेराव यांनी केले. त्यानुसार पूर्तता करून अहवाल सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने दिले. तहसीलदार, मुळशी यांना आयोगाने केलेल्या विचारणेनंतर दि.३०.११.२००९ रोजी त्यांनी अहवाल सादर केला. श्रीमती बारभाई यांना संबंधित विषयाच्या चर्चेसाठी बोलावले होते, परंतु त्या आल्या नाहीत. नंतरच्या काळात लोकसभा निवडणूक व विधानसभा निवडणूक व अधिकाऱ्यांच्या बदल्या यामुळे मूळ आदेशानुसार कार्यवाहीस व अहवाल सादर करण्यास विलंब झाला, असे निवेदन तहसीलदार, मुळशी श्री.भाऊसाहेब जाधव यांनी या अहवालात केले आहे. तसेच सौ.बारभाई यांनी केलेल्या मूळ तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहितीही त्यांना देण्यात आल्याचे अहवालात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१४.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

डॉ. संदीप विठ्ठल रोहकले — अपीलकर्ता
मु.पो. पिंपळवडी, ता. जुन्नर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा लेखाधिकारी, लेखापरीक्षण पथक, पुणे जिल्हा — उत्तरवादी
११, सिनेग्राम स्ट्रीट, पुणे-१

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक, पुणे जिल्हा
११, सिनेग्राम स्ट्रीट, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | डॉ. संदीप विठ्ठल रोहकले<br>मु.पो. पिंपळवडी, ता. जुन्नर, जि. पुणे |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | लेखाधिकारी, लेखापरीक्षण पथक, पुणे जिल्हा<br>११, सिनेग्राम स्ट्रीट, पुणे-१<br>श्री. पुंडलिक गंगाराम पायधन |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक,<br>पुणे जिल्हा ११, सिनेग्राम स्ट्रीट, पुणे-१<br>श्री. विजयकुमार प्रल्हाद सोनवणे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेल्या माहितीत मूळ कागदपत्रांमध्ये बदल करून जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक, पुणे यांनी सुभाष विद्या मंदिर पिंपळवंडी, ता. जुन्नर या प्रशालेतील हितसंबंधितांशी संगनमत करून खोटी कागदपत्रे दिली. माहितीच्या अधिकारातील अर्ज दिल्यानंतर कागदपत्रात फेरफार केला आहे, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ. संदीप विठ्ठल रोहकले यांनी केली.

डॉ. रोहकले या विषयात सातत्याने अर्ज व विविध स्वरूपाचा पत्रव्यवहार करीत आले आहेत. वेळोवेळी त्याना मूळ कागदपत्रानुसार माहिती देण्यात आली आहे. प्रशालेकडून आलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात आल्या आहेत. आपण अथवा अन्य अधिकाऱ्यांनी त्यात फेरफार करण्याचा व खोटी कागदपत्रे करण्याचा प्रश्न येत नसून हा आरोप खोटा आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक, पुणे श्री. पुंडलिक गंगाराम पायधन यांनी केले.

डॉ. रोहकले यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विशेष चौकशी करून मुख्याध्यापकांकडून सत्य प्रती करून देण्यात आल्या. सर्व कागदपत्रे शाळेकडील असून आपल्या कार्यालयाकडील नाहीत. अधिकाऱ्यांच्या समोर कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढून सत्य प्रती घेऊन दिल्या आहेत. या शिवाय चौकशी झाली त्याच दिवशीची ही कागदपत्रे आहेत. खोटी कागदपत्रे करणे इत्यादी आरोप निराधार आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा लेखाधिकारी, लेखा परीक्षण पथक, पुणे श्री. विजयकुमार प्रल्हाद सोनवणे यांनी केले.

मूळ हजेरी पत्रकातील बदल, लेखा परीक्षण तपासणीच्या दरम्यान मूळ प्रतीत केलेला फेरफार, सादर केलेल्या लेखा परीक्षण अहवालात उल्लेख नसलेल्या प्रती पुरविणे, अनेक मुद्दयांचे सखोल विश्लेषण आवश्यक असताना न करणे इ. आक्षेप डॉ. रोहकले यांनी लेखी निवेदनात नोंदविले आहेत. तथापि या बाबी प्रशासकीय कार्यवाहीशी संबंधित असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तसेच मूळ कागदपत्रे बदलून खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली, या आरोपाची शहानिशा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. आवश्यक वाटल्यास अपीलकर्ता त्याबाबत उचित न्यायासनाकडे तक्रार नोंदवू शकतात. अभिलेखातील कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या असून मूळ अभिलेखानुसार त्या असल्याचे जन माहिती अधिकारी तथा

कनिष्ठ लेखापरीक्षक, लेखापरीक्षण पथक, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा लेखाधिकारी, लेखा परीक्षण पथक, पुणे यांनी ते प्रमाणित केले.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ११ .१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. देविदास धोंडीबा टेकाळे
मु.पो.पिंपळगाव माळवी, जि.अहमदनगर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. देविदास धोंडीबा टेकाळे, मु.पो.पिंपळगाव माळवी, जि.अहमदनगर<br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्यातील ९२४ अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्ण वेळ करण्याच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हा निहाय माहिती आपण मागितली होती. परंतु मूळ अर्जाला उत्तर दिले नाही. आपण प्रथम अपील दाखल केल्यानंतर शुल्क भरण्याबाबतचे पत्र पाठविले. परंतु विलंबामुळे माहिती निःशुल्क मिळाली

पाहिजे, असा अर्ज आपण केल्यानंतर दिलेली माहिती अपुरी असून जिल्हा निहाय नमुन्यात माहिती मिळाली नाही. सन २००४ साली ही माहिती संकलित करून शासनाला पाठविण्यात आली होती. सन २००६ साली शासनाने त्यावर निर्णय घेतला. परंतु संकलित माहिती नसल्याचे सन २००९ मध्ये आपल्याला कळविले. यावरुन जाणीवपूर्वक माहिती देणे टाळले जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. देविदास धोंडीबा टेकाळे यांनी केली.

श्री. टेकाळे यांनी मागितलेली माहिती विस्तृत असून जिल्हा निहाय संकलनात्मक माहिती उपलब्ध नसल्यामुळे ती प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नात उत्तर देण्यास विलंब झाला. मात्र माहिती नि:शुल्क दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे श्री. सदानंद शंकरराव शिंदे यांनी केले.

सन २००४ मध्ये संकलित केलेल्या माहितीची प्रत अपीलकर्त्यांस दोन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी आपल्याला अवलोकनासाठी उपलब्ध करून दिलेल्या संचिकेमध्ये आपल्याला अपेक्षित असलेली माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार श्री. टेकाळे यांनी दि. २५.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी त्याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. देविदास धोंडीबा टेकाळे यांना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा व आयोगाने दि. १६.११.२००६ च्या पत्रान्वये मागविल्यानुसार अहवाल विहित मुदतीत सादर न करणे ही गंभीर बाब असून त्याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दि. २५.१.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ३१.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण
संपादक झेप यांचे कार्यालय,
अब्दुल हमीद शॉपिंग सेंटर,इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव,
श्रीराम क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ,
धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
छत्रपती शिवाजी विद्यालय, धायटी,
ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३१/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.०२.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण<br>संपादक झेप यांचे कार्यालय अब्दुल हमीद शॉपिंग सेंटर,इंदापूर,<br>ता.इंदापूर, जि.पुणे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.०६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.०७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.०७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शिवाजी विद्यालय, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,श्रीराम क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी दिली नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' व आयोगाकडील सुनावणी या दोन्ही वेळी ते गैरहजर होते. माहिती न देण्याबाबतचा

खुलासा करण्याचे आदेश उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,सोलापूर यांनी देऊनही माहिती दिलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण यांनी केले.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रम'ची पूर्वसूचना उशिरा मिळाल्यामुळे हजर राहता आले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शिवाजी विद्यालय, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.मच्छिंद्र बापू जगताप व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,श्रीराम क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर श्रीमती निर्मला संदीपान इंगवले यांनी आयोगास कळविले. तथापि सुनावणीतील गैरहजेरीबाबत तसेच माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचाही खुलासा केलेला नाही. ही बाब गंभीर आहे.

श्री.चव्हाण यांनी विशिष्ट कर्मचाऱ्याच्या संदर्भातील खुलासा स्पष्टीकरण यांची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशी विचारणा करता येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शिवाजी विद्यालय, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी अपीलकर्त्यास उत्तर देणे आवश्यक होते. सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शिवाजी विद्यालय, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,श्रीराम क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी अपीलकर्त्यास कोणतेही उत्तर दिलेले दिसत नाही.

अपीलकर्ता श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण यांच्या अर्जावर व अपिलावर केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल, तसेच आयोगापुढील सुनावणीच्या वेळच्या गैरहजेरीबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शिवाजी विद्यालय, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.मच्छिंद्र बापू जगताप व तत्कालीन व्यवस्थेनुसार असलेले अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,श्रीराम क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ, धायटी, ता.सांगोला, जि.सोलापूर श्रीमती निर्मला संदीपान इंगवले यांनी दि.२०.०१.२०१० पर्यंत खुलासा आयोगाला सादर करावा. अन्यथा ते कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दिनांक : ३० /१२/२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रणजित आप्पासो व्हनवाडे
मु.पो.शिरढोण, ता.शिंरोळ, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्यकार्यकारी अधिकारी,
कोल्हापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या.
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४ + ४२४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.७.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. रणजित आप्पासो व्हनवाडे
मु.पो.शिरढोण, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा — मुख्यकार्यकारी अधिकारी,
कोल्हापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या.
कोल्हापूर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १२४ / कोल्हापूर | २१.१.२००७ | २२.२.२००७ | १३.३.२००७ | ३.४.२००७ |
| ४२४ / कोल्हापूर | २९.१.२००७ | २८.३.२००७ | -- | ३.४.२००७ |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

कोल्हापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्यादित, कोल्हापूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा संस्थेला लागू नसल्याच्या कारणावरून माहिती नाकारली. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी माहिती देण्याचा आदेश संस्थेला दिला. त्यानंतरही आपल्याला अपूर्ण माहिती मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रणजित आप्पासो व्हनवाडे यांनी केली. (अपील क्र.१२४ ) या अपिलात अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी दिलेला निर्णय योग्य नसल्यामुळे आपण पुर्नविलोकन अर्ज केला, तो त्यांनी फेटाळला. त्यानंतर माहिती देण्यात आली. संस्थेने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी नियुक्त करून तसे फलक लावावेत, असाही आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. तथापि कोल्हापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्यादित ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही, त्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी अपीलकर्ता मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर जिल्हा देखरेख संघ लि., कोल्हापूर यांनी केली. (अपील क्र.४२४)

कोल्हापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्यादित,कोल्हापूर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० अन्वये नोंदणी झालेली सहकारी संस्था आहे. संस्थेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत वा भांडवल मिळत नाही. सहकार कायद्यातील कलम ६९ (अ ) प्रमाणे जिल्हा देखरेख संस्थेची स्थापना झालेली नसून सदर कलमान्वये शिखर देखरेख संस्थेची आणि तालुका देखरेख संस्थांची स्थापना झालेली आहे. तसेच संस्थेत मुख्य कार्यकारी अधिकारी पदाच्या वर अन्य कोणतेही पद नाही. त्यामुळे अपिलीय प्राधिकारी नेमण्याचे झाल्यास सहकार खात्यानेच असे पद निर्माण करावे लागेल. सध्या उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हा सहकारी बँकेचे अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करीत आहेत. तथापि संस्था स्थापन झाली तेव्हा व उच्च न्यायालयाच्या आदेशापूर्वी सहाय्यक निबंधक हेच देखरेख संस्थेचे काम पाहत होते. या बाबी लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संस्थेला लागू होत नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दादू दत्तात्रय संकपाळ यांनी केले.

जिल्हा देखरेख सहकारी संस्था कोणताही स्वतंत्र व्यवसाय करीत नाही. महाराष्ट्र सहकार कायदा, १९६० चे नियम ५३ (३) नुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व संबंधित विकास संस्था

यांच्याकडून मिळणारी वर्गणी या संस्थेला देण्याची तरतूद शासनाने केली आहे. ही वर्गणी किती असावी याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार संस्थेला नसून सहकार खात्याला आहेत. संस्थेची लेखा तपासणी शासनामार्फत केली जाते, तसेच विकास संस्थेकडे थकलेल्या वर्गणीची वसुली तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यांच्यामार्फत केली जाते. या सर्वांवरून संस्थेतील शासनाचा सहभाग व सर्वांगीण नियंत्रण स्पष्ट होते. तसेच जिल्हा पातळीवर मक्तेदारीच्या स्वरूपाचे स्थान असलेली ही एकमेव संस्था असते. या बाबी लक्षात घेता संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००९ लागू होतो, असे प्रतिपादन श्री. व्हनवाडे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता जिल्हा देखरेख सहकारी संस्था ही पूर्णतः शासनावर अवलंबून व शासकीय नियंत्रणाखाली असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते व तिला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयात याचा तपशीलवार ऊहापोह केलेला नाही, तो करणे आवश्यक होते. संस्थेवरील सहकार खात्याचे नियंत्रण लक्षात घेता सहकार खात्यातील संबंधित अधिकारी अपिलीय प्राधिकारी असला पाहिजे. त्यानुसार निर्णय करून फलक लावावेत. तसेच अपीलकर्त्यांस काही माहिती संस्थेने दिली आहे. विस्तृत व तपशीलवार माहिती अपीलकर्त्यास हवी असल्यास अभिलेखाचे अवलोकन करू द्यावे व आवश्यक माहिती नियमानुसार शुल्क आकारुन उपलब्ध करून द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील क्र. १२४ मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्र. ४२४ अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री.अविनाश तुकाराम मोटे **अपीलकर्ता**
संघवी हाईटस, भिगवण रोड, बारामती,
ता.बारामती, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी संचालक,
श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि.,
शेलगांव-भाळवणी, आदिनाथनगर, पो.जेऊर,
ता.करमाळी, जि.सोलापूर ४१३ २०२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५२ / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.१७.०७.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.०५.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.०६.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.०८.२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - सन १९९५-९६ ते २००६ कालावधीतील प्रतिटन व प्रति क्विंटल साखर उत्पादन खर्चाची माहिती मिळणेबाबत | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दिनांक १७.०७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये या अपीलाचा समावेश करण्यात आला होता. तथापि अपीलकर्ता श्री.अविनाश तुकाराम मोटे या कार्यक्रमास गैरहजर होते. त्यामधील प्रपत्रात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि., शेलगांव-भाळवणी, आदिनाथनगर, पो.जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी

श्री.एम.आर.जायभाय यांनी श्री.मोटे यांना मागणीप्रमाणे माहिती दिल्याचे नमूद करुन त्या माहितीची प्रत सोबत सादर केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. : ३०-१२-२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. अच्युत कृष्ण जातेगावकर (कुलकर्णी) — अपीलकर्ता
जातेगाव खुर्द, ता. शिरूर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५६/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे श्री. आर. के. शेळके | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जमिनीच्या संदर्भात दि. ४.२.१९८६ च्या निकालाच्या अनुषंगाने आपण केलेल्या अर्जावर खोटी व अपूर्ण माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अच्युत कृष्ण जातेगावकर (कुलकर्णी)यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

श्री. जातेगावकर यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर देऊन योग्य माहिती देण्यात आली आहे. मूळ कागदपत्रांनुसार आवश्यक तर त्यांना त्याबाबत तपासणी करता येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. संचिकेत उपलब्ध नसलेली माहिती देता आलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर,ता. शिरूर श्री. आर.के.शेळके यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय सहदेव वाघमारे
प्लॉट नं.२४१, रोहिणीनगर भाग-३, जुळे सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती मोघम असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,सोलापूर यांनी दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचा निर्णय योग्य ठरविला, म्हणून अपीलकर्ता श्री.संजय सहदेव वाघमारे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.वाघमारे यांनी सन १९९५ ते २००६ अशी सुमारे ११ वर्षांच्या कालावधीतील सरसकट माहिती मागितली आहे. विशिष्ट शाळांची माहिती मागितल्यास माहिती देता येईल, असे त्यांना कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केले. श्री.वाघमारे यांचा अर्ज पाहता विस्तृत स्वरूपाची व सरसकट पध्दतीने माहिती मागितली आहे, हे लक्षात घेता त्यांनी अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक ती माहिती प्राप्त करून घेणे उचित ठरेल.

माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.के.सगरे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. त्याबाबतचा तपशील त्यांनी आयोगास सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२८.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.भास्कर का.गायकवाड
१ बी/६, अेबीसी एम्प्लॉइज सह.हौंसिंग सोसा.
पवनानगर, चिंचवडगांव, पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय कराड,
ता.कराड, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग प्रमुख,
शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय कराड,
ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.भास्कर का.गायकवाड
१ बी/६, अेबीसी एम्प्लॉइज सह.हौंसिंग सोसा.
पवनानगर, चिंचवडगांव पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड,
ता.कराड, जि.सातारा श्री.सतीश बाळकृष्ण भिसे

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग प्रमुख,
शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड,
ता.कराड, जि.सातारा श्री.अधिकराव व्यंकटराव यादव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०७.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागणी केल्याप्रमाणे सत्य प्रतींसह मूळ माहिती आपल्याला दिली नाही. अनावश्यक कागदपत्रांच्या प्रती देऊन अनावश्यक रक्कम वसूल केली आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.भास्कर का.गायकवाड यांनी केली.

श्री.गायकवाड यांनी अन्य प्राध्यापकांच्या संदर्भातील अनुभवांचे प्रमाणपत्र आदींच्या सत्य प्रती मागितल्या होत्या. परंतु आपल्या कक्षेतील कागदपत्रांच्या सत्य प्रती देण्यात आल्या असून आपल्याकडील सत्यप्रतींवरुन सत्य प्रती देता येणार नाहीत, असे श्री.गायकवाड यांना वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे. प्रा.ढवळे यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव आपल्या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेला नसल्यामुळे व मंत्रालयात केलेल्या अर्जाची प्रत आपल्याकडे नसल्याचे संबंधितांनी लेखी दिलेले असल्यामुळे ती माहिती देणे शक्य नाही. अनावश्यक शुल्क घेतल्याची श्री.गायकवाड यांची तक्रार रास्त नाही. रु.२६/- शुल्क होत असताना त्यांच्याकडून रु.१५/- शुल्क घेतलेले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख,शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड,ता.कराड, जि.सातारा श्री.अधिकराव व्यंकटराव यादव यांनी केले.

अपीलकर्ता श्री.गायकवाड यांना महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली आहे. तथापि वारंवार त्याच प्रतींचा मागणी ते करीत असून माहिती-मागणीच्या त्यांच्या

हेतूबद्दल शंका आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय कराड,ता.कराड, जि.सातारा श्री.सतीश बाळकृष्ण भिसे यांनी केले.

महाविद्यालयाने सादर न केलेल्या प्रस्तावाची प्रत यासारखी श्री.गायकवाड यांनी केलेली माहितीची मागणी योग्य नाही. तसेच सत्य प्रतींवरुन सत्य प्रती करुन देता येत नाही, हे जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख,शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय,कराड,ता.कराड, जि.सातारा श्री.अधिकराव व्यंकटराव यादव यांचे प्रतिपादन रास्त आहे. प्रा.ढवळे यांना ज्या प्रस्तावानुसार ६ वेतनवाढींचा शासन आदेश काढण्यात आला त्याची माहिती १५ दिवसांत मंत्रालयातून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार आपल्याला प्रती न मिळाल्याची तक्रार श्री.गायकवाड यांनी केली. तथापि उपरोक्त वेतनवाढीच्या शासन आदेशासह आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या छायाप्रती श्री.गायकवाड यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी सहसंचालक तंत्रशिक्षण कार्यालय, पुणे श्री.गो.पं.चौधरी यांनी श्री.गायकवाड यांना कळविल्याच्या पत्राची प्रत पाहता संबंधित माहिती श्री.गायकवाड यांना देण्यात आली आहे, असे दिसते. पुन:पुन्हा त्याच माहितीची मागणी करुन सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम वाया घालवू नये, अशी समज अपीलकर्ता श्री.भास्कर का.गायकवाड यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ११/१२/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**